# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.
☏ /फॅक्स २५६५६२३४ Email :ropune.dte@gmail.com Web:ropune.org.in

महत्वाचे/ लोकआयुक्त/स्मरणपत्र/
जा.क्र.विकापु/विवि/लोकआयुक्त/4039 दिनांक : २२/०५/२००८

प्रति,
प्राचार्य,
पदवी / पदव्यूत्तर पदवी अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माण शास्त्र/
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी / पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन
एम.बी.ए./ एम.सी.ए संस्था

विषय : (लोक आयुक्त प्रकरण क्र.७६२/२००५ आय-१५)
श्री. एल. आर. राणे यांनी औद्योगीक शिक्षण मंडळाचे इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल बिझनेस ॲण्ड रिसर्च ठाणे येथील प्रशिक्षणासाठी अवाजवी फी आकारण्याबाबत मा. उपलोक आयुक्त यांच्यकडे केलेली तक्रार

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/विवि/८८६३ दिनांक २७-०११-२००७
२) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/लोकआयुक्त/२००८/४४५ दिनांक ०५-०५-२००८

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व पदवी आणि पदव्यूत्तर अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माण शास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी / पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन/ एम.बी.ए./ एम.सी.ए संस्थाना कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्रमांक एक अन्वये उपरोक्त माहिती या कार्यालयास विना विलंब सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी ब-याच संस्थांनी सदरची माहिती सादर केलेली नाही. आपल्या सुलभ संदर्भासाठी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर दिंनाक २७-११-२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदरची माहिती उपलोक आयुक्त यांना सदर करावयाची असल्याने उलट टपाली माहिती सादर करावी. ज्या संस्था सदरची माहिती सादर करणार नाहीत अशा संस्थांवर लोक आयुक्त कार्यालयाकडून काही कार्यवाही झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील यांची सर्व संस्था प्रमुखांनी नोंद ध्यावी.

तसेच सर्व संस्थानीं विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, विकास शुल्क, इतर शुल्क व स्टडी मटेरिएल चार्जेस यांची माहिती संस्थेच्या माहिती पुस्तकांमध्ये नमूद करणे आवश्यक असून सर्व माहिती संस्थेच्या वेबसाईटवर प्रकाशित करावयाची आहे. त्याच प्रमाणे शिक्षण शूल्क समितीने निधर्सारीत केलेल्या शुल्का पेक्षा तसेच माहिती पुस्तकेमध्ये नमुद केलेल्या शुल्का पेक्षा जास्त फी/ शुल्क स्विकारण्यात येऊ नये. कोणत्याही विद्यार्थ्यांकडून किंवा पालकांकडून अंतिरिक्त शुल्क / फी घेतल्या संबंधीत तक्रार प्राप्त झाल्यस त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाचालकांची राहील यांची नोंद ध्यावी.

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१ यांना महितीस्तव सादर
श्री. शिन्दे एस. बी., प्रोग्रॅमर यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.